स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय विरार
विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर — ४०१३०५

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. वविशम/सा.वा/ २३ /२०२६
दिनांक - १५ / १० / २०२६

## जाहिर दरपत्रक

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयात जमा असलेली जुनी वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, वार्षिके व दिवाळी अंक इ. वाचनसाहित्याची जमा असलेली रद्दी विक्री करावयाची आहे. त्याकरिता सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत जाहिर दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदरची दरपत्रके दि.२८/ १०/२०२६रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय, विरार, दुसरा मजला, टोटाळे तलावाच्या बाजूला विरार (पू.) येथे दिलेल्या मुदतीत जमा करावयाची आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशिल | प्रमाण अंदाजित | रद्दीचा दर (प्रती किलो) |
|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक वाचनालयात जमा असलेली जुनी वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, वार्षिके व दिवाळी अंक यांची रद्दी विक्री करणे. | प्रती किलो | सर्व प्रकारच्या वाचन साहित्याच्या रद्दीचा दर रुपये (अंकात)<br><br>रुपये (अक्षरी) |

## अटी व शर्ती

१) दरपत्रकधारकाने वरील कामाचा सिलबंद लिफाफा दि.२८/१० /२०२६रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय, विरार दुसरा मजला टोटाळे तलावाच्या बाजूला विरार (पू.) येथे दिलेल्या मुदतीत जमा करावयाचे आहेत.
२) ठेकेदारांनी दरपत्रक भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा. तसेच लिफाफा क्र. १ (तांत्रिक बाबी) मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश असणे आवश्यक आहे. (अ) पॅनकार्ड (ब) आधारकार्ड इ. कागदपत्रांचा लिफाफा क्र. १ (तांत्रिक बाबी) मध्ये समावेश नसल्यास लिफाफा क्र. २ (आर्थीक/ वित्तीय/दराचा) उघडण्यात येणार नाही.
३) लिफाफा क्र. २ (आर्थिक/ वित्तीय/दर बाबी) मध्ये प्रती किलोचा दर नमुद करावा. त्यासाठी व्यक्ती अथवा संस्थेच्या लेटर हेडचा वापर करावा.
४) मुदतीत प्राप्त झालेली सर्व दरपत्रके स्विकारणेचे अथवा नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.
५) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाने ०८ दिवसांचे आत कार्यालयात उपस्थित राहून सदरच्या कामाचा करारनामा करावयाचा असून सर्व रद्दीची होणारी एकूण रक्कम महानगरपालिकेच्या फंडात जमा केल्यानतरच कार्यादेश देण्यात येईल? मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
६) रद्दी जशी आहे तशी व जेथे आहे तेथून मुदतीत घेऊन जाण्याची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.
७) मनुष्यबळ, वाहन व यंत्रसामुग्री महानगरपालिका पुरविणार नाही.
८) शासनाचे सर्व विविध कर महानगरपालिकेच्या फंडात जमा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची आहे.
९) वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत, त्यांचे दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका ह्यांना असेल.
१०) नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या जिवित व वित्त हानीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
११) सदरचे दरपत्रक महानगरपालिकेच्या सुचना फलकावर व अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका जि. पालघर

उप- आयुक्त (वाचनालय)
वसई विरार शहर महानगरपालिका